# तुमच्या मनाला मंत्राच्या प्रकाशाने भरून टाका

१ ऑगस्ट, २०१९

आत्मीय वाचकांनो,

वर्ष २०१९मधील या नवीन महिन्याच्या आरंभी तुमच्याशी पुन्हा एकदा संवाद साधताना मला अतिशय आनंद होतो आहे. सिद्धयोग मार्गावर, वर्षाचा प्रत्येक महिना असे प्रसंग घेऊन येतो की, ज्यांचे महोत्सव साजरे करता येतील, ज्यांचा सन्मान करता येईल आणि जे हृदयात जतन करता येतील. या ऑगस्ट महिन्यात आपण अशा दोन प्रसंगांचा मंगलमय उत्सव साजरा करतो, की ज्यांचे जगभरातील सिद्धयोगींसाठी अतिशय महत्त्व आहे — भगवान नित्यानंदांची सौर पुण्यतिथी आणि बाबा मुक्तानंदांचा दिव्य दीक्षा दिवस.

८ ऑगस्टला आपण भगवान नित्यानंदांची सौर पुण्यतिथी साजरी करणार आहोत, ज्यांना प्रेमाने बडे बाबा असे संबोधिले जाते. ही सौर पुण्यतिथी सन् १९६१मधील त्या दिवसाची वर्षगाठ आहे, ज्या दिवशी बडे बाबांनी पृथ्वीतलावरील आपली जीवनयात्रा पूर्ण केली आणि ते परम चितीत विलीन झाले. जन्मसिद्ध असलेल्या बडे बाबांच्या कृपाप्रसादाने, त्या सर्वांचे उन्नयन झाले ज्यांनी त्यांच्या चरणकमलांचा आश्रय घेतला. सिद्धयोग गुरूंच्या या महान परंपरेतील बडे बाबा, हे बाबा मुक्तानंदांचे गुरू आहेत आणि बाबा मुक्तानंद हे आपल्या परमप्रिय गुरुमाईंचे श्रीगुरू आहेत.

१५ ऑगस्टला आपण १९४७मधील त्या ऐतिहासिक दिवसाचा उत्सव साजरा करतो, ज्या दिवशी बाबा मुक्तानंदांनी बडे बाबांकडून दिव्य दीक्षा प्राप्त केली. याच परम जागृतीने बाबा मुक्तानंदांना आत्मसाक्षात्काराच्या पथावर अग्रेसर केले. आपल्या श्रीगुरूंच्या कृपाप्रसादाने, बाबांनी त्यांच्या साधनेचे ध्येय साध्य केले. ते मुक्त आत्मा झाले, ते एक असे सिद्ध बनले की, ज्यांनी शक्तिपात दीक्षेद्वारे जगभरातील असंख्य जिज्ञासूंची सुप्त कुंडलिनी शक्ती जागृत केली.

मानवजीवनाच्या उपहाराचा लाभ होणे तसेच एका सिद्धगुरूंकडून शक्तिपात दीक्षा प्राप्त होणे, हे एका आध्यात्मिक साधकाचे स्वर्णिम सद्भाग्य असते. माझ्या जीवनातील ही अत्यंत दुर्लभ घटना म्हणजेच श्रीगुरुमाईंकडून शक्तिपात दीक्षा प्राप्त होण्याच्या या प्रसंगामुळे विस्मित होऊन मी कधीकधी विराम घेते आणि स्वतःला हा प्रश्न विचारते : "माझ्या श्रीगुरूंकडून दीक्षा प्राप्त होणे याचे माझ्यासाठी *काय* महत्त्व आहे?" कदाचित, तुम्हीदेखील स्वतःला हा प्रश्न विचारला असेल. विचारलात का?

एक मुमुक्षु म्हणून, सिद्धयोग मार्गावरील एक विद्यार्थी म्हणून, आणि श्रीगुरुमाईंची शिष्या म्हणून मला असे वाटते की, या प्रश्नावर मननचिंतन केल्याने माझ्यासमोर ते आशीर्वाद अनावृत होतात, जे माझ्या जीवनातील या एका अपूर्व क्षणामध्ये सामावलेले आहेत. आणि हे मननचिंतन श्रीगुरूंच्या शिकवणींचे पालन करण्याच्या, साधनेचा पाठपुरावा तळमळीने करण्याच्या, तसेच साधनेच्या अंतिम ध्येय प्राप्तीपर्यंत पोहोचण्याच्या माझ्या वचनबद्धतेला सशक्त बनवते.

***

मधुर सरप्राइझ् २०१९मध्ये, गुरुमाईंनी ते मार्ग आपल्याला उपहार स्वरूपात प्रदान केले, ज्यांच्या माध्यमातून आपण या वर्षाच्या त्यांच्या संदेशाचा अभ्यास करू शकतो आणि त्यांचे आपल्या जीवनात प्राकट्य होऊ देऊ शकतो. मी अशाच एका मार्गाचा इथे उल्लेख करू इच्छिते. त्यांच्या संदेश प्रवचनात गुरुमाईंनी आपल्याला एक विशिष्ट मंत्र प्रदान केला आहे आणि त्याचा जप करण्याचे तंत्र समजावून सांगितले आहे. गुरुमाईंनी आपल्याला असे सांगितले आहे की, मंत्रजपाच्या या तंत्राचा अभ्यास मनाला त्याच्या खऱ्या स्वभावाशी, त्याच्या स्वतःच्या प्रकाशाशी जोडतो. संदेश प्रवचनातील हा भाग तुम्हाला आठवतो आहे का? जर आठवत नसेल, तर तुम्ही मधुर सरप्राइझ् २०१९मध्ये पुन्हा एकदा सहभागी होऊ शकता, जेणेकरून या गहनतम शिकवणीची तुमची आठवण नवीनतम होईल.

श्रीगुरूंनी प्रदान केलेला मंत्र चैतन्य असतो; तो श्रीगुरूंच्या शक्तीने अनुप्राणित असतो. अशा मंत्राचा जप दिव्य आशीर्वादांचा वर्षाव करतो आणि ज्या संकल्पासह त्याचा जप केला जातो तो संकल्पदेखील प्रकट करतो.

मधुर सरप्राइझ् २०१९मध्ये गुरुमाईंनी आपल्याला शिकवलेल्या मंत्रजपाच्या तंत्राचा अभ्यास मी जेव्हा करते, तेव्हा मला असे वाटते की, प्रसन्नता माझ्या अंतरी नृत्य करते आहे आणि प्रशांतीने व निस्तब्धतेने

मला आच्छादित केले आहे. स्वतःच्या आत्म्याशी असलेल्या भावबंधाची सुस्पष्ट अनुभूती मला होते आणि माझे मन त्याच्या स्वतःच्या वैभवात स्नान करू लागते. संपूर्ण निश्चिंततेने मी हे जाणते की, माझे मन त्याच्या स्वतःच्या खऱ्या स्वभावामध्ये विश्रांत होते आहे.

***

ऑगस्ट हा महिना आपल्यासाठी उत्सव साजरे करता येतील असे अनेक अन्य प्रसंगदेखील घेऊन येतो.

रक्षाबंधन हा सण अमेरिकेत १४ ऑगस्टला आणि भारतात १५ ऑगस्टला आहे. हा सण हिंदू पंचांगानुसार श्रावण महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. सिद्धयोग मार्गावर, या सणादरम्यान आपण श्रीगुरू आणि शिष्यादरम्यान असलेल्या प्रेमाच्या आणि संरक्षणाच्या भावबंधाचा उत्सव साजरा करतो.

१५ ऑगस्ट हा दिवस भारताचा स्वतंत्रता-दिवसही आहे; हा त्या दिवसाच्या सन्मानार्थ साजरा केला जातो, ज्या दिवशी ७२ वर्षांपूर्वी सन १९४७मध्ये भारत देश एक स्वतंत्र राष्ट्र झाला. या अविस्मरणीय दिवशी बाह्य आणि आंतरिक रूपांतरणाच्या दृढ शक्ती एकत्र आल्या; बाबांना दिव्य दीक्षेचा पावन उपहार प्राप्त झाला आणि भारत देशाला स्वतंत्रता मिळाली.

श्रीकृष्ण जन्माष्टमी म्हणजेच भगवान कृष्णाचा जन्मदिवस, हा सण अमेरिकेत २३ ऑगस्टला आणि भारतात २४ ऑगस्टला साजरा केला जाईल. ज्या पद्धतींनी प्रत्येक वर्षी सिद्धयोगी भगवान कृष्णाची पूजा करतात, त्यामधील काही म्हणजे : भगवान कृष्णाच्या नामाचे संकीर्तन करणे आणि त्याला समर्पित असलेल्या मंत्रांचे पठन करणे.

***

या महिन्यात सिद्धयोग मार्गाची वेबसाइट आपल्याला वाचण्यासाठी, ऐकण्यासाठी आणि त्याच्याशी संलग्न होण्यासाठी अपरिमित खजिना प्रस्तुत करते आहे. इथे ती सर्व सामग्री उपलब्ध आहे जिच्याशी आपण गुरुमाईंच्या नववर्ष संदेशाच्या आपल्या अध्ययनाला आधार प्राप्त व्हावा म्हणून स्वतःला जोडून घेत आलेलो आहोत. याबरोबरच, या महिन्यात मी वर उल्लेख केल्याप्रमाणे सिद्धयोगातील पवित्र

कार्यक्रमांच्या सन्मानार्थ अंतर्दृष्टी प्रदान करणारे लेख, व्हीडिओ, फोटो-गॅलरीज् आणि कविता तुमच्यासाठी उपलब्ध असतील. या विशेष आकर्षणांपैकी काही गोष्टींविषयी मी तुम्हाला सांगू इच्छिते :

- निराकार मंदीर — बडे बाबांच्या सन्मानार्थ, श्रीगुरुमाईंची एक कविता. या कवितेचे वाचन ही स्वभावतःच एक प्रकारची धारणा आहे.
- भगवान नित्यानंदांसमवेतचे प्रसंग — ऑडिओ रेकॉर्डिंगज्च्या स्वरूपात.
- बाबा मुक्तानंदांचे दर्शन व त्यांचे प्रज्ञान — बाबांच्या शिकवणींसह त्यांच्या छायाचित्रांच्या या संकलनाद्वारे त्यांच्या प्रज्ञानाविषयी आणखी अधिक शिका आणि त्यांचे पवित्र दर्शन प्राप्त करा.
- बाबा मुक्तानंदांच्या शिकवणी — अभ्यास करण्यासाठी, अध्ययन करण्यासाठी व आत्मसात करण्यासाठी.
- मोक्षप्राप्तीची उत्कंठा "मुमुक्षुत्व" — बेन विलियम्स् यांच्याद्वारे लिखित एक भाष्य.
- अभ्यास-पत्र २७-३१ — वर्ष २०१९च्या श्रीगुरुमाईंच्या संदेशाच्या सातत्यपूर्ण अनुसंधानासाठी आणि त्याच्या अभ्यासासाठी.
- ध्यान सत्र ८ : *The Miracle of the Mind*

***

मंत्रजप हा एक असा सिद्धयोग अभ्यास आहे, ज्याच्याशी आपण कुठेही, कोणत्याही वेळेला जोडले जाऊ शकतो. या ऑगस्ट महिन्यात मी असे ठरवले आहे की, मधुर सरप्राइझ् २०१९मध्ये गुरुमाईंनी आपल्याला दिलेल्या मंत्रजपाच्या अभ्यासावर मी एकाग्र होईन. त्यांनी शिकवलेल्या तंत्राचा वापर मी करेन, जे त्यांनी त्यावेळी आपल्याला शिकवले. आणि मी तुम्हालादेखील तसे करण्यासाठी प्रोत्साहित करते. आपण जेव्हा जप करतो, तेव्हा आपण आपल्या मनाला दिव्यतेच्या प्रकाशाने भरून टाकतो.

१६व्या शतकातील भारताचे महान संतकवी तुलसीदास भगवान रामाचे परमभक्त होते. त्यांच्यासाठी भगवंताचे नाम हा तो मंत्र होता, ज्याचा ते सतत जप करत असत. एका उत्कृष्ट मानसचित्रणाद्वारे तुलसीदास या दोह्यात मंत्रजपाचे महत्त्व अधोरेखित करतात. ते लिहितात :

राम नाम मनिदीप धरु जीह देहरी द्वार।
तुलसी भीतर बाहेरहुँ जौं चाहसि उजिआर॥

तुलसीदास म्हणतात, जर तुमची इच्छा असेल की, तुमच्या अंतरात आणि बाहेर, दोन्ही ठिकाणी प्रकाश असावा, तर रामनामरूपी रत्नदीप प्रज्वलित करा आणि तो जिह्वा रूपी उंबरठ्यावर ठेवा — जो तुमच्या अंतरंगाचे प्रवेशद्वार आहे.[१]

आदरपूर्वक,

गरिमा बोरवणकर

---

१ इंग्रजी भाषांतर ©२०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन.

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.